लोकमत

# वैभव डांगे यांना 'इंडिया-युरोप' फोरमचा पुरस्कार

## आयईबीएफ एक्सलन्स अवॉर्ड : हाऊस ऑफ लॉर्ड्‌समध्ये सोहळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली** : दिल्ली मराठी प्रतिष्ठानचे मुख्य प्रवर्तक वैभव डांगे यांना आईबीएफ-इंडिया युरोपीयन बिझिनेस फोरमने 'आयईबीएफ एक्सलन्स' पुरस्काराने गौरविले. लंडनमध्ये ब्रिटिश संसदेच्या 'हाऊस ऑफ लॉर्ड्स' मध्ये १८ नोव्हेंबरला झालेल्या दिमाखदार सोहळ्यात पुरस्कार वितरण करण्यात आले. भारतीय अर्थ, उद्योग क्षेत्रातील बहुमोल योगदानासाठी डांगे यांना हा पुरस्कार देण्यात आला.

भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार कपिल देव, उद्योजक जी.पी. हिंदुजा, लंडनचे उपमहापौर राजेश अगरवाल, आयईबीएफचे विजय गोयल, 'सार्क'चे सीए सुनील गुप्ता, लॉर्ड लुंबा, लॉर्ड ढोलकिया आदी उपस्थित होते.




'आयईबीएफ एक्सलन्स' पुरस्कार स्वीकारताना वैभव डांगे. डावीकडून सुनील गुप्ता, लॉर्ड लुंबा, विजय गोएल, संदीप वर्मा व कपिल देव.

### यांनाही पुरस्कार

- अभिनेते सुनील शेट्टी, फिनोलेक्स समूहाच्या रितू प्रकाश छाबरिया, जर्सीचे मुख्यमंत्री सिनेटर जॉन ल फॉंड्री, अँजल इनव्हेस्टरचे अनुप जैन, अॅकलाऊंड टेक्नॉलॉजीचे रॉस जेम्स, एशियन मीडिया ग्रुप यूकेचे मनीष तिवारी व जेम्स क्लिफॉर्ड यांनाही आईबीएफ-इंडिया यूरोपीयन बिझिनेस फोरमने गौरविले.

फिक्कीमध्ये आपल्या कामाचा ठसा उमटवणाऱ्या वैभव डांगे यांना केंद्रीय परिवहन मंत्रालयातही कामाचा अनुभव आहे.